INDIAN STREAMS RESEARCH JOURNAL
ISSN NO : 2230-7850
IMPACT FACTOR : 5.1651 (UIF)
VOLUME - 13 | ISSUE - 6 | JULY - 2023

# राजर्षी शाहू महाराज: शैक्षणिक विचार आणि योगदान

**डॉ. धनंजय बाबुरावजी कदम**
**माजी प्राचार्य, स्व. ज्ञानेश्वररावजी मेंघरे शिक्षण महाविद्यालय, कोंढा-कोसरा, ता. जि. भंडारा.**

**प्रस्तावना:**



आधुनिक महाराष्ट्राच्या इतिहासात आपल्या शैक्षणिक कार्याद्वारे बहुजन समाजाला जागरूक करून त्यांचा सर्वांगीण विकास घडवून आणण्यासाठी अनेक समाजसुधारक आणि विचारवंतांनी शिक्षणाच्या पवित्र कार्यात योगदान दिले. त्यामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांचे कार्य अतिशय उल्लेखनीय व अविस्मरणीय असे आहे. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्याचे दारिद्र्य, अज्ञान व अंधश्रद्धा नष्ट होणार नाही, याची शाहू महाराजांना जाण होती म्हणून त्यांनी शिक्षणाच्या प्रसारावर विशेष भर दिला. शिक्षणाने व्यक्तीचा बौद्धिक, मानसिक व सांस्कृतिक विकास घडून येतो. शिक्षणामुळे व्यक्तीचा व्यक्तीमत्त्व विकास होवून मनुष्य आत्मनिर्भर बनतो. त्यातूनच आदर्श, संस्कारक्षम व उत्तम नागरिक तयार होतो. शिक्षणामुळेच मनुष्य जीवनात यशस्वी वाटचाल करू शकतो. शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे साधन आहे, हे शाहू महाराजांना पक्के अवगत होते. महाराजांनी समता व न्यायाला धरूनच आपले कार्य पुढे रेटले.

**शाहू महाराजांचे शैक्षणिक विचार:**

- **प्राथमिक शिक्षणाच्या सार्वत्रिकरणावर भर:** जात-पात, धर्म-पंथ, लिंग अथवा शारीरिक अपंगता विचारात न घेता सर्वांसाठी शिक्षणाची सोय करून दिली. बहुजन समाज शिकून शहाणा झाल्याशिवाय त्यांचे दारिद्र्य, अज्ञान दूर होणार नाही हे जाणून शाहूंनी विशेषतः प्राथमिक शिक्षणाच्या प्रसारावर भर दिला. सर्वांसाठी प्राथमिक शिक्षण मोफत आणि सक्तीचे केले.
- **माध्यमिक व उच्च शिक्षणावर भर:** सामान्य जनतेला माध्यमिक व उच्च शिक्षणाचे दरवाजे खुले व्हावे म्हणून हायस्कूल व महाविद्यालये स्थापन करण्याचा विचार केला व सोयी सवलती, शिष्यवृत्ती, वसतिगृहे यांची तरतुद केली.
- **लोकशिक्षणावर भर:** संस्थानातील प्रत्येक खेड्यात बहुसंख्यांक जातीच्या इसमाच्या नेतृत्वाखाली एक-एक शाळा असावी अशी त्यांची धारणा होती. यामुळे उच्च-नीच्चता तसेच जातीभेद दूर होवून ऐक्य नांदेल व खऱ्या अर्थाने साक्षरता आणि लोकशाही वाढीस लागेल असे त्यांना वाटे.
- **सर्वांसाठी शिक्षण:** शिक्षणामुळे सर्वांचा विकास होतो, हे राजर्षी शाहूंचे मत होते. शिक्षणाशिवाय उद्धार नाही याची त्यांना जाण असल्यामुळे दीनदलित, अस्पृश्यांसाठी त्यांनी शिक्षणाची संधी प्राप्त करून दिली. जोपर्यंत भारतातील प्रत्येक स्त्री-पुरूषास शिक्षण मिळत नाही तोपर्यंत भारत स्वतंत्र, समृद्ध आणि बलवान होवू शकत नाही. म्हणून सर्वांना शिक्षण मिळावे यासाठी त्यांचा कटाक्ष होता.

- **समाजशिक्षणातून समाजपरिवर्तन:** सामाजिक परिवर्तन घडवून आणण्यासाठी शिक्षण हे महत्त्वाची भूमिका बजावत असते. त्यामुळे शिक्षण हा सामाजिक परिवर्तनाचा महत्त्वाचा घटक समजला जातो. यासाठी आपला देश व समाज प्रगतीशील व्हावा म्हणून शाहू महाराजांनी सार्वजनिक शिक्षणाचा विस्तार केला.
- **स्त्री शिक्षणास चालना:** स्त्रियांच्या भौतिक व आत्मिक विकासासाठी अग्रक्रमाने स्त्रियांना शिक्षण देणे तसेच त्यांच्या सर्वांगीण व्यक्तीमत्त्व विकासासाठी, स्व-संरक्षण करण्यासाठी, बरेवाईट समजण्यासाठी शिक्षणाची गरज आहे असे शाहू महाराजांना प्रकर्षाने वाटत असे. स्त्री शिक्षणाच्या माध्यमातून त्यांनी आपले जीवन निरर्थक नसून ती एक सामाजिक पूजा असल्याचा विचार प्रज्वलित केला होता.
- **क्रीडा शिक्षणविषयक विचार:** राजर्षी शाहूंनी मल्लविद्येला लोकशिक्षणाचे सामर्थ्यवान अंग समजून शरीरसंपत्तीला पुरूषार्थाचे साधन मानले होते. कुस्ती, दांडपट्टा व इतर मर्दानी खेळात सहभाग घेतल्याने प्रकृती उत्तम राहते म्हणून त्यांनी क्रीडाविषयक शिक्षणाला महत्त्व दिले.
- **तांत्रिक शिक्षणविषयक दृष्टिकोन:** केवळ शेतकरी व सैनिक बनण्याचे समाधान न ठेवता. व्यापार व उद्योगही केले पाहिजे म्हणून व्यापार उद्योगासाठी शिक्षण प्रशिक्षणाची गरज प्रतिपादित केली.
- **शिक्षण प्रसारासाठी विविध योजना:** शिक्षणाच्या प्रसाराला गती देण्यासाठी त्यांनी वतनी शिक्षण, शाळा पंचपद्धती, शिक्षकांचे प्रशिक्षण व सैनिकी, संस्कृत, पुरोहीत, पाटील अशा विविध शाळा तसेच शिष्यवृत्ती योजना, ग्रंथालये, वसतिगृहांची स्थापना इत्यादी योजना राबविल्या.

**शाहू महाराजांच्या शैक्षणिक कार्याची वैचारिक सूत्रे:**

राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा उक्तीपेक्षा कृतीवर भर होता. शिक्षण हे वैचारिक क्रांतीचे बीज आहे असे समजून सामाजिक सुधारणा करण्यासाठी त्यांनी शिक्षणाची कास धरली. त्यांच्या शैक्षणिक कार्याची वैचारिक सूत्रे पुढीलप्रमाणे होती-

- शिक्षणानेच समाजपरिवर्तन शक्य आहे.
- वंचितांना शिक्षण मिळावे म्हणून सर्वांसाठी प्रत्येक गावात शाळा आवश्यक आहे.
- प्राथमिक शिक्षण सक्तीचे व मोफत करणे.
- शेतकऱ्यातून शिक्षक तयार करणे.
- शिक्षणाशिवाय सामाजिक अन्यायातून सुटका होणे शक्य नाही.
- ग्रामीण जनतेच्या माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय करणे.
- स्त्री शिक्षणास चालना देणे.
- प्रशिक्षित शिक्षक उपलब्ध करून देणे.
- व्यापार उद्दिमासाठी तंत्र शिक्षण देणे.
- सैनिकांना सुशिक्षित करण्यासाठी गणिताचे ज्ञान देणे.
- विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबन, शिस्त, देशप्रेम, सहकार्य इत्यादी गुणांचा विकास करण्यासाठी शिक्षण देणे.

**शाहू महाराजांच्या शैक्षणिक चळवळीची चतुःसूत्री:**

1. प्राथमिक शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे, नंतर माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणाची सोय करणे.
2. बहुजन समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील घटकांना शिक्षणाच्या सोयी-सवलती उपलब्ध करून देणे.
3. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शहरात येवून अल्प खर्चात शिक्षण घेता यावे म्हणून शहरात वसतिगृहे सुरू करणे.

4. शिक्षणावरील विश्वास वाढविण्यास रोजगाराची सोय व नोकऱ्यांमध्ये राखीव जागांची तरतुद करणे.

**शैक्षणिक कार्य:**

1. **प्राथमिक शिक्षण:** जोपर्यंत बहुजन समाज खऱ्या अर्थाने साक्षर होणार नाही तोपर्यंत लोकशाहीला डोळसपणा येणार नाही असे शाहू महाराजांचे मत होते. प्राथमिक शिक्षण हे एक पायाभूत शिक्षण असून ते समाजातील सर्व स्तरापर्यंत पोहचले पाहिजे म्हणून त्यांनी 24 जुलै 1917 रोजी एक हुकूम काढून कोल्हापूर संस्थानात प्राथमिक शिक्षण मोफत व सक्तीचे केले. राजर्षी शाहूंनी पहिली कार्यवाही 4 मार्च 1918 रोजी चिरवली येथे पहिली मोफत प्राथमिक शाळा सुरू करून केली. या उपक्रमामुळे त्यांनी जातीनिर्मूलनाच्या महान कार्यात प्रत्यक्ष कृतीद्वारे प्रारंभ केला. प्राथमिक शिक्षणासाठी त्यांनी पुढील तरतुदी केल्या होत्या.

- खेड्यात शिक्षक मिळणार नाही म्हणून वंशपरंपरेने एकाच कुटुंबातील व्यक्तींना शिक्षक म्हणून नेमणे व त्यासाठी त्यांना जमीन वतन म्हणून देवून वतनी शिक्षक योजना राबविली.
- शिक्षकाचे प्रशिक्षण अतिशय महत्त्वाचे समजून शिक्षकांना प्रशिक्षणासाठी प्रोत्साहित केले.
- चांगले शिक्षक निवडण्यासाठी प्राथमिक शिक्षक भरतीपूर्व परीक्षा सुरू केली.
- शिक्षण प्रसारासाठी शिक्षण कर लागू केला.
- मूलांना शिक्षणासाठी बाहेरगावी जावे लागू नये म्हणून गाव तिथे शाळा ही कल्पना समोर ठेवून खेडोपाडी शाळा सुरू केल्या. गरीब, अस्पृश्य मुलांसाठी तसेच मुलींसाठी शिष्यवृत्ती योजना सुरू केल्या.

2. **माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण:** सामान्य जनतेला माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मिळण्यासाठी 'राजाराम हायस्कूल' सारख्या अनेक माध्यमिक शाळा सुरू केल्या. तसेच उच्च शिक्षणासाठी त्यांनी महाविद्यालयाची स्थापना केली आणि संस्कृत विषय अभ्यासण्यासाठी 'छत्रपती संस्कृत महाविद्यालयाची' स्थापना केली. अस्पृश्य मुलांना व अन्य समाजातील मुलींना शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली. पुण्यातील डेक्कन एज्युकेशन सोसायटी, श्री शिवाजी मराठा सोसायटी या संस्थांना सक्रिय मदत व प्रोत्साहन दिले.

- **वसतिगृहाची स्थापना:** सर्व समाजासाठी शिक्षणाचे दरवाजे खुले करणे हे शाहू महाराजांचे धोरण होते. प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न सुटला तरी माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षणासाठी सोय करणे प्रत्येक खेडेगावात शक्य नव्हते यासाठी शहराच्या ठिकाणी राहून विद्यार्थ्यांना शिक्षण घेता यावे म्हणून शाहू महाराजांनी वसतिगृहांची स्थापना केली. सर्वात प्रथम त्यांनी सर्व जातीच्या विद्यार्थ्यांसाठी कोल्हापूर येथे एक वसतिगृह सुरू केले होते. त्यानंतर त्यांनी जातीनिहाय वसतिगृहांची स्थापना केली. त्यांनी मराठा, मुसलमान, शिंपी, कायस्थ प्रभू, सारस्वत इत्यादी जातीतील मुलांसाठी वसतिगृहांची स्थापना केली. कोल्हापूर प्रमाणेच त्यांनी नाशिक, नगर, पुणे येथेही वसतिगृहांची स्थापना केली. अशाप्रकारे त्यांनी ज्ञानगंगा वंचितांच्या दारी पोहचविण्याचा प्रयत्न केला.
- **शिष्यवृत्त्यांची सोय:** जनसामान्यात शिक्षणाची गोडी निर्माण व्हावी आणि शिक्षणात आवश्यक अशी आर्थिक मदत देण्यासाठी शिष्यवृत्त्या देण्याची योजना अंमलात आणली. त्यामध्ये अस्पृश्य जातीच्या विद्यार्थ्यांना, तांत्रिक शिक्षण घेणाऱ्यांना, उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना तसेच मुलींच्या शिक्षण प्रसारासाठी राजर्षींनी विशेष सोय केली होती.
- **स्त्री शिक्षण:** स्त्रियांना घोड्यावर बसणे, ड्रायव्हिंग करणे, शिकार खेळणे इत्यादी मर्दानी शिक्षण देण्याची व्यवस्था केली. स्त्रियांसाठी त्यांनी बालविवाह, विधवा विवाह, हिंदू-जैन संमिश्र विवाह इत्यादीविषयी प्रगत कायदे करून त्यांची अंमलबजावणी केली.
- **उद्योग शाळा:** उद्योगांचा विकास व्हावा म्हणून त्यांनी 1912 साली 'जयसिंगराव घाटगे टेक्निकल इन्स्टिट्युट'ची स्थापना केली. तसेच 'छत्रपती राजाराम औद्योगिक मंदिर', 'कलागृह औद्योगिक स्कूल' सुरू केले. साक्षरतेबरोबर सामाजिक विकासासाठी औद्योगिकरणाची

गरज ओळखून त्यांनी तांत्रिक शिक्षणाचे दरवाजे सर्वांना उघडे केले. त्यांनी सुतारकाम, लोहारकाम व चित्रकला, शिक्षणाची सोय केली. तांत्रिक शिक्षणाबरोबर त्यांनी अनेक उद्योग व्यवसायांनाही प्रोत्साहन दिले.

- **सैनिकी शाळा:** शाहू महाराजांना सैनिक शिक्षणाचे महत्त्व पटले होते, त्यासाठी त्यांनी 'इन्फन्ट्री स्कूल' सुरू केले. सैनिकास साक्षरता गणित इत्यादी शिक्षणाची सोय उपलब्ध करून दिली.
- **पुरोहित शाळा:** वैदिक धर्माचे शिक्षण केवळ विशिष्ट जातीच्या पुरोहितांच्या हातात न राहता सर्वांना मिळावे म्हणून पुरोहित शाळा काढल्या व त्यास अनुदान दिले. 1920 साली कोल्हापूर येथे 'श्री शिवाजी क्षत्रिय वैदिक विद्यालय' सुरू केले.
- **पाटील शाळा:** कुलकर्णी वेतन नष्ट केल्यानंतर खेडेगावचा कारभार पाटलांकडे सोपविण्यात आला. गावातील सार्वजनिक कामे नीट व्हावी म्हणून या शाळा उघडण्यात आल्या. या शाळेत पाटील व ग्रामसेवकांना मोफत शिक्षण देण्याची व्यवस्था करण्यात आली.
- **शिक्षक प्रशिक्षण केंद्रे:** अनुभवी शिक्षक तयार व्हावे म्हणून शिक्षकांना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण केंद्रे सुरू करण्यात आली. प्रशिक्षणात बालबोध व मोडी लेखन, मराठी भाषा, अंकगणित, शालेय व्यवस्था, अध्यापन पद्धती या विषयांचा समावेश होता.
- **ग्रंथालये:** शाहू महाराजांनी सार्वजनिक ग्रंथालयाची स्थापना केली. यासाठी एक निधी उभारला व त्यातून गरीब विद्यार्थ्यांना मोफत पुस्तके पुरविण्याची योजना राबविली.
- **शुद्रांचे शिक्षण:** दलित समाजात जागृती करण्यासाठी शिक्षणाचा प्रसार तसेच शिष्यवृत्त्यांची योजना आखली. मागासलेल्या जातीत शिक्षणाबद्दल फारशी आस्था नसल्याने व त्याचे कारण शिक्षण घेवूनही सरकारी नोकरी लाभण्याची शक्यता नसल्याने शाहूंनी 26 जुलै 1902 रोजी कोल्हापूर संस्थानातील 50 टक्के शासकीय नोकऱ्या मागासलेल्या वर्गासाठी राखीव ठेवल्याचा जाहिरनामा काढला. राखीव जागांचे धोरण अंमलात आणणारे शाहू हे हिंदूस्थानातील पहिले राज्यकर्ते ठरले. अशाप्रकारे अस्पृश्यतेचे उच्चाटन हे शाहूंनी आपले जीवित कर्तव्य मानले.
- **आश्रमशाळा:** इ.स. 1920 मध्ये महाराजांनी करवीर नगरीत आश्रमशाळेचे बीजारोपन करून एक नवीन शिक्षण प्रयोग अंमलात आणला. राजर्षी शाहूंचा शिक्षणातील दृष्टीकोन हा समाजहिताच्या बांधिलकीच्या भावनेने भारावलेला होता हे दिसून येते.

## सामाजिक कार्य:

- **सत्यशोधक चळवळीचे नेतृत्व:** महात्मा फुलेंच्या 'सत्यशोधक' चळवळीला नवसंजीवनी देण्याचे काम शाहू महाराजांनी केले. ते महात्मा फुलेंच्या विचाराचे पाईक होते. म्हणून फुलेंच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी त्यांनी कोल्हापुरात सत्यशोधक समाजाची शाखा स्थापन केली. महाराजांनी या चळवळीचे कणखर नेतृत्व करून संपूर्ण महाराष्ट्रात सर्वत्र वेगाने पसरविली. सनातनी व कालबाह्य धर्माच्या आधारे पोसली जाणारी समाजातील जातीय विषमता नष्ट करण्यासाठी ही चळवळ होती.
- **ब्राम्हणेत्तर चळवळ:** सत्यशोधक चळवळीचे पुढे ब्राम्हणेत्तर चळवळीत रूपांतर झाले. बहुजन समाजाला संघटित करून त्यांना त्यांचे न्याय- हक्क मिळवून देणे, हा त्या पाठीमागचा उद्देश होता. या चळवळीच्या वाढत्या प्रभावामुळे बहुजन समाजाला महाराष्ट्राच्या राजकीय व सामाजिक जीवनात महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झाले.
- **महार वतनाचा अंत आणि अस्पृश्यता निवारण:** राजर्षी शाहू महाराजांच्या काळात अस्पृश्यांना शिवणे अपवित्र समजले जात होते. महाराज अस्पृश्यांची स्थिती व दर्जा सुधारण्यासाठी सतत विचार करीत असत. पाटील, कुलकरण्यांप्रमाणे महार वतनदारांना त्यांच्या वतनाला सामाजिक व राजकीय प्रतिष्ठा नव्हती व मानपणही नव्हता. महार हे महारकीच्या वर्तनामुळे उच्चवर्णीयांच्या गुलामगिरीत अडकले होते. सामाजिक व आर्थिक गुलामगिरी नष्ट करण्यासाठी शाहू महाराजांनी एक अस्पृश्य परिषद भरवून महार वतन रद्द केले व अस्पृश्यांना न्याय मिळवून दिला.
- **शेती व उद्योगाला चालना:** शाहू महाराजांनी शेतीविषयक व्यवसायाच्या शिक्षणाची सोय करून देऊन अज्ञानी, निरक्षर व गरीब समाजाला उत्तम शेती करण्यासाठी प्रवृत्त केले. औद्योगिक विकास केल्याशिवाय देशाची प्रगती होऊ शकत नाही हे महाराजांना माहित

होते. त्यामुळे शेती व उद्योग याकडे महाराजांनी विशेष लक्ष दिले. विविध उद्योगांच्या माध्यमातून विविधप्रकारे विकास करण्यात त्यांचा मोलाचा वाटा आहे. दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी पाण्याची व सिंचनाची सोया व्हावी यासाठी प्रयत्न केले कोल्हापूर संस्थानात हरितक्रांती घडवून आणण्याचा त्यांनी पुरेपूर प्रयत्न केला.

याशिवाय विधवा-पुनर्विवाह कायदा, पडदा पद्धतीचा निषेध, आंतरजातीय विवाह कायदा, क्रूरपणाच्या वर्तनास प्रतिबंध करणारा कायदा, घटस्फोटाचा व वारसाचा कायदा, देवदासी प्रथेस प्रतिबंध अशाप्रकारे अनेक कायदे तयार करून समाजविघातक जुलमी,जाचक अशा प्रथा व परंपरा यांचा बिमोड करण्याचा राजर्षी शाहू महाराजांनी मोठ्या धाडसाने व पराक्रमाने प्रयत्न करून मोठी सामाजिक बांधिलकी सिद्ध केलेली आहे.

## समारोप:

महाराष्ट्राच्या सामाजिक परिवर्तनाच्या इतिहासात राजर्षी शाहू महाराजांचे स्थान फार वरच्या दर्जाचे आहे. राजर्षी शाहू महाराज हे बोलके सुधारक नव्हते, ते कर्ते सुधारक होते. त्यांनी सामाजिक सुधारणा करण्यासाठी शिक्षण या प्रबल साधनांचा प्रभावी वापर केला. विचारपूर्वक स्वीकारलेल्या सामाजिक व राजकीय तत्त्वांच्या बाबतीत कोणतीही तडजोड न करता या तत्त्वांची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेले असामान्य धाडस त्यांच्यात होते. महाराष्ट्रातील करवीर तथा कोल्हापूर संस्थानचे अधिपती, थोर समाजसुधारक, शिक्षण, जातीभेद निवारण, अस्पृश्यता निवारण इत्यादी सुधारणांचे पुरस्कर्ते, बहुजनांचे दैवत म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते. महात्मा फुलेंच्या शैक्षणिक कार्याचा आदर्श त्यांच्या मनात होता. महात्मा फुलेंच्या महानिर्वाणानंतर त्यांच्या विचारकार्याचा द्वीप शाहू महाराजांनी तेवत ठेवला. त्यांची कारकीर्द केवळ 28 वर्षे एवढी होती. वयाच्या 20 व्या वर्षी कोल्हापूर संस्थानचा राज्यकारभार पाहण्याची जबाबदारी त्यांच्यावर सोपवण्यात आली होती. ते प्रथम छत्रपती, महाराज, राजर्षी आणि लोकनेते या नावाने जनसामान्यात परिचित झाले. यावरून 'जीवन किती वर्षे जगता येते यापेक्षा ते कसे जगता येईल' हे शाहू महाराजांच्या कार्यावरून स्पष्ट होते. त्यांच्या कार्यामुळेच त्यांचे व्यक्तीमत्त्व केवळ कोल्हापूर संस्थानापुरतेच मर्यादित न राहता अखिल महाराष्ट्रातच नव्हे तर भारतातही लोकप्रिय झाले.

## संदर्भसूची:


1. शैक्षणिक विचारवंत (भारतीय आणि पाश्चिमात्य), विद्या प्रकाशन, नागपूर: डॉ. के. यु. घोरमोडे, डॉ. कला कृष्णा घोरमोडे.
2. प्रगत शैक्षणिक तत्त्वज्ञान, नित्य नूतन प्रकाशन, पूणे: डॉ. अरविंद दुनाखे
3. उदयोत्सुक भारतीय समाजातील शिक्षण, फडके प्रकाशन, कोल्हापूर: डॉ. सुरेश करंदीकर, डॉ. मीना मंगरूळकर.
4. राजर्षी शाहू छत्रपती, एक समाज क्रांतिकारी राजा, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई: धनंजय कीर.
5. वृत्तपत्रातील विविध लेख व मासिके.